RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ५०] शुक्रवार, एप्रिल १०, २०२६/चैत्र २०, शके १९४८ [पृष्ठे २ , किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १६६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०००३२, दिनांक १० एप्रिल, २०२६.

आदेश

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.

क्रमांक मुद्रांक २०२५/प्र. क्र. २४६/मुद्रांक-२.— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याद्वारे, मुंबई मधील महानगरपालिकेच्या शाळांमधील, बालवाड्यांमधील मुले व सार्वजनिक रुग्णालयांतील प्रतिकूल परिस्थितीशी सामना करणारी कुटुंबे यांच्याकरिता आपत्ती निवारण कार्ये करण्याच्या प्रयोजनार्थ, घोडपदेव येथील फ्रेरे लँड इस्टेट येथे स्थित असलेल्या माझगाव विभागाच्या नगर भूमापन क्र. ४/७४८ या २८५२ इतक्या चौरस मीटर क्षेत्रफळाच्या आरआर क्र. २०६० या जमिनीच्या बाबतीत मुंबई बंदर प्राधिकरण आणि एचकेएम चॅरीटेबल फाउंडेशन यांच्यामध्ये करण्यात आलेल्या भाडेपट्ट्याच्या संलेखावर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद ३६ अन्वये अन्यथा आकारण्यायोग्य असलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क, पुढील शर्तींस अधीन राहून, माफ करीत आहे :—

शर्ती.-

(१) हा आदेश, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या तारखेपूर्वी पट्टाकाराने/पट्टेदाराने आधीच मुद्रांक शुल्क प्रदान केलेले असेल त्या बाबतीत, कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(२) जर या आदेशान्वये, मुद्रांक शुल्कातील सूट मिळवणारा कोणताही पट्टाकार/पट्टेदार, उक्त प्रयोजन किंवा उक्त प्रयोजनाची उद्दिष्टे पूर्ण करण्यास निष्फळ ठरला तर, तो, जणू काही, मुद्रांक शुल्कात सुरुवातीपासूनच कोणतीही सूट दिलेली नव्हती असे समजून, उक्त अधिनियमानुसार, संपूर्ण मुद्रांक शुल्क व शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सत्यनारायण बजाज,
शासनाचे सहसचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 10 April, 2026.

Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2025/C.R.No.246/Mudrank-2.—In exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty in whole, as otherwise chargeable under Article 36 of Schedule-I appended to the said Act, on the instrument of lease, executed between the Mumbai Port Authority and HKM Charitable Foundation in respect of the land bearing RR No.2060 admeasuring 2852 Sq. Mtrs. bearing C.S.No.4/748 of Mazgaon division situated at Frere Land Estate at Ghodapdeo for the purpose to cater to disaster relief efforts, children in Municipal Schools, Balwadis and underprivileged families in the public hospitals in Mumbai, subject to the following conditions, namely :—

Conditions .—

(*1*) No refund shall be granted where the stamp duty has already been paid by the Lessor/ Lessee prior to the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

(*2*) If any Lessor/Lessee availing remission of the stamp duty under this order fails to fulfil the purpose or objectives of the said purpose, the shall be liable to pay the whole stamp duty and penalty as per said Act, as if there was no remission of stamp duty from the beginning.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.